# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक २०-०६-२०१२ रोजी (का.प.क्र. ४४)संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.**

बुधवार दिनांक दिंनाक २०-०६-२०१२ रोजी मा.महापौर सौ.अनिता नंदकुमार घोडेले यांचे अध्यक्षतेखाली महापालिकेची सर्वसाधारण सभा मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे दु.१.३० वाजता वंदेमातरम या गिताने सुरू झाली. सभेला प्र.मा.आयुक्त श्री.कुणालकुमार ,भा.प्र.से.,नगरसचिव श्री.रविंद्र निकम तसेच संबंधीत अधिकारी व खालील प्रमाणे स. सदस्य उपस्थित होते.

१. स.स.श्री.देसरडा प्रशांत सुभाष
२. स.स.श्री.विकास जैन
३. स.स.श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत
४. स.स.डॉ.खान जफर अहेमद
५. स.स.श्री.बन्सी ग्यानु जाधव
६. स.स.श्रीमती सुरे सविता संतोष
७. स.स.श्री.राजगौरव हरीदास वानखेडे
८. स.स.श्रीमती वाघमारे ज्योती रुपचंद
९. स.स.श्रीमती सलामपुरे पुष्पा देविदास
१०. स.स.श्री.जाधव ज्ञानोबा पांडुरंग
११. स.स.श्रीमती वाणी सावित्रीबाई हिरालाल
१२. स.स.श्री.मिलींद यशवंतराव दाभाडे
१३. स.स.श्री.बेहडे अशोक किसनराव
१४. स.स.डॉ.खान नुझत तरन्नुम खान उमर
१५. स.स.श्री.भुईगळ अमित सुधाकर
१६. स.स.श्रीमती अहिरे संगिता राजु
१७. स.स.श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
१८. स.स.श्री.माळवतकर महेश शिवाजीराव
१९. स.स.श्री.अनिल जुगललाल जैस्वाल
२०. स.स.श्री.बोराडे रामदास काशिनाथ
२१. स.स.श्री.दहिहंडे मनिष चंद्रकांत
२२. स.स.श्री.चौधरी संजय सांडू

२३. स.स.श्री.कोकाटे काशिनाथ हरिभाऊ
२४. स.स.श्रीमती भाले प्राजक्ता मंगेश
२५. स.स.श्री.इंगळे सुरेश सांडुजी
२६. स.स.श्री.खान जहांगिर अब्बास
२७. स.स.श्रीमती जरीना म.जावेद
२८. स.स.श्री.अब्दुल रऊफ खान महेमूद खान
२९. स.स.श्री.मिर्झा सलीम बेग मिर्झा हमीद बेग
३०. स.स.श्रीमती तोतला प्रिती संतोषकुमार
३१. स.स.श्रीमती राजपूत प्राजक्ता विश्वनाथ
३२. स.स.श्री.जाधव विजेंद्र मुरलीधर
३३. स.स.श्रीमती शिंदे किर्ती महेंद्र
३४. स.स.श्री.अनिल श्रीकिसन मकरिये
३५. स.स.श्रीमती कविता संजय जाधव
३६. स.स.श्री.मीर हिदायत अली मीर बसालत अली
३७. स.स श्री.अफसर खान यासीन खान
३८. स.स.श्री.फिरदोस फातेमा खान
३९. स.स.श्री.चव्हाण हुशारसिंग मांगेराम
४०. स.स.श्री.गादगे विरभद्र रामलींग
४१. स.स.श्रीमती रेखा अजित जैस्वाल
४२. स.स.श्रीमती सय्यद मेहरुन्निसा खाजा
४३. स.स.श्रीमती रेणुका कृष्णा वाडेकर
४४. स.स.श्री.खान आगा मिया खान
४५. स.स.श्रीमती सोनवणे सुनिता सुनिल
४६. स.स.श्री.नासेर खान अब्दुल रहेमान खान
४७. स.स.श्री.समीर सुभाष राजुरकर
४८. स.स.श्री.बबन पंडितराव नरवडे
४९. स.स.श्री.वाघचौरे विजय लक्ष्मण
५०. स.स.श्री.मधुकर दामोधर सावंत
५१. स.स.श्री.तुपे त्रिंबक गणपतराव
५२. स.स.श्रीमती शोभा पुखराज काळे

५३. स.स.श्री.केनेकर संजय किसनराव
५४. स.स.श्री.कुलकर्णी सुरेंद्र माणिकराव
५५. स.स.श्रीमती कला रविनंदन ओझा
५६. स.स.श्रीमती निरपगारे पुष्पा कांतीलाल
५७. स.स.श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड
५८. स.स.श्री.शिंदे सत्यभामा दामोदर
५९. स.स.श्री.निलाबाई देविदास जगताप
६०. स.स.श्रीमती गांगवे कौशल्याबाई बन्सीलाल
६१. स.स.श्रीमती घडमोडे सविता भगवान
६२. स.स.श्री.कुचे नारायण तिलोकचंद
६३. स.स.श्रीमती कमल रामचंद्र नरोटे
६४. स.स.श्री.मुंडे बाळासाहेब दिनकर
६५. स.स.श्री.दिग्विजय संभाजी शेरखाने
६६. स.स.श्री.जायभाये सुर्यकांत सुभानराव
६७. स.स.श्री.भारसाखळे पंकज रामचंद्र
६८. स.स.श्री.खेडकर सुशिल तुकाराम
६९. स.स.श्री.निमगावकर प्रल्हाद गणपतराव
७०. स.स.श्री.जोशी संजय रामदास
७१. स.स.श्री.हाळनोर गिरजाराम नानाराव
७२. स.स.श्री.खान अक्रम करीम खान
७३. स.स.श्री.बारवाल गजानन रामकिसन
७४. स.स.श्रीमती सुनिता भारत बरथुने
७५. स.स.श्री.शेख खाजा शरफोद्दीन
७६. स.स.श्रीमती मोरे आशाबाई राजेश
७७. स.स.श्री.गायकवाड रावसाहेब धोंडीराम
७८. स.स.श्रीमती वेताळ छाया शाईनाथ

**<u>नामनिर्देशित पालिका सदस्य</u>**

०१. स.स.श्री.कुलकर्णी गोपाळ शरदराव
०२. स.स.श्री.मालानी प्रफुल्ल लालचंद
०३. स.स.श्रीमती पाटील रेखा दिनकरराव
०४. स.स.श्री.अभिजित भास्करराव देशमुख
०५. स.स.श्रीमती हेमलता प्रकाश मुगदिया

**चर्चा :**

श्री.काशिनाथ कोकाटे : शहरात व विशेषतः सिडको हडको भागात पिण्याचे पाणी पुरेसे येत नाही. काय उपाययोजना केली दोन दिवसाआड पाणी पुरवठा होतो तरी सुध्दा पुरेसा पाणीपुरवठा होत नाही समांतर जलवाहिनी संदर्भात प्रशासनाने प्रेझेंटेशन दाखवले वृत्तपत्रात वेगवेगळे वाचले ते सभागृहाला सुध्दा दाखवण्याची गरज होती सर्व नागरीक व स.सदस्यांचा जिव्हाळयाचा विषय .वेळीच माहिती दिली नाही तर याचा बोजा नागरीकांवर पडणार म्हणून ही योजना कशी आहे कशा प्रकारे राबविणार त्या बाबतीत प्रेझेंटेशन दाखविणे आवश्यक आहे जी एजन्सी पहिल्यांदा होती ती गायब आहे वृत्त पत्रात आले अमुक वेळेस उदघाटन होणार असे वाचण्यात येते या योजनेसाठी किती पैसा खर्च होणार योजना कशी राबविणार माहिती दयावी ६७ कोटी जलवाहिनीच्या योजने प्रमाणे या योजनेचे होवू नये.

श्री.गिरजाराम हळनोर :समांतर जलवाहिनी विषयी पावर पॉईन्ट प्रेझेंटेशन नुसार सभागृहाला तसेच शहरातील सर्व नागरीकांना आवाहन करून त्यांना माहिती दाखविण्यात यावी.

मा.महापौर :प्रशासनाने पावर पॉईन्ट प्रेझेंटेशन नुसार सभागृहाला समांतर जलवाहिनी विषयी माहिती दाखविण्यात यावी.

**<u>विषय क्र. ७८२:</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान शासन निर्णय क्रं.एसयुआर/२००८/प्र.क्रं/२०३/नवि ३३ दिनांक २० फेब्रुवारी २०१० नुसार शहरात विविध सुविधा पुरविने करीता ५० टक्के शासन अनुदान व उर्वरीत ५० टक्के सुलभ व्याज दराने कर्ज मिळणे करीता प्रकल्प प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभा ठराव क्रं.१००५ दिनांक २०.२.२०१० मंजुरीन्वये शासनास सादर केलेले आहे.

शासनास सादर केलेल्या प्रस्तावांपैकी शहरातील मलनिःसारण व्यवस्था सुधारणे व शहरात मलप्रक्रिया केंद्र बांधणे बाबतच्या रक्कम रुपये ३६७.१६ कोटीच्या प्रकल्प प्रस्तावास (DPR) महाअभियानाच्या प्रकल्प मान्यता व संनियंत्रण समितीने दिनांक १९.३.२०१२ रोजी झालेल्या बैठकीत तत्वतः मंजुरी दिलेली आहे.

प्रकल्प मान्यता व संनियंत्रण समितीने दिनांक १९.३.२०१२ रोजीच्या बैठकीत महानगरपालिकेचे सर्व सन्माननीय पदाधिकारी यांच्या सह चर्चेन्वये एकुण प्रकल्प किमंती पैकी ५० टक्के शासन अनुदान उपलब्ध करुन देणार आहे व उर्वरीत ५० टक्क्े कर्ज स्वरुपात उभारणी करण्यासाठी महाअभियानाच्या शासन निर्णयानुसार Muinfra या शासन नियुक्त कंपनी कडे रितसर आर्थिक ताळेबंदासह प्रस्ताव सादर करुन कर्ज उभारणी बाबत सुचना प्राप्त झालेली होती.

शासन निर्देशान्वये महानगरपालिके मार्फत रितसर कर्ज मंजुरी प्रस्ताव Muinfra या शासन नियुक्त कंपनी कडे आर्थिक ताळेबंदासह सादर करण्यात आला असता Muinfra या कंपनीने उक्त रक्कम रुपये ३६७.१६ कोटीच्या प्रकल्प प्रस्तावापैकी ५० टक्के म्हणजेच रुपये १८३.५८ कोटीचे कर्ज देणे इतपत कंपनी आर्थिकदृष्टया सक्षम नसल्याने Muinfra या कंपनी सोबतच इतर वित्तीय संस्थाकडुन कर्जपुरवठया संदर्भाने पडताळणी करणे बाबत सुचना केली.

Muinfra या कंपनीच्या सुचनेनुसार तसेच Housing and urban development corporation limited (Hudco) या संस्थेने उक्त प्रकल्प प्रस्तावा साठी शासन अनुदान व्यतिरिक्त उर्वरीत ५० टक्के रक्कमे करीता Public sector Borrowers साठी कर्ज म्हणुन पुरवठा करण्यास सहमती दर्शविलेली आहे.

शहरात मलयुक्त पाण्यामुळे होणारे प्रदुषण रोखण्यासाठी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ औरंगाबाद यांनी महानगर पालिकेस section 33 (a) of the water (prevention & control of pollution ) act 1949 नुसार दिलेल्या नोटीसच्या अनुषंगाने करावयाची कार्यवाही सत्वर करणेच्या दृष्टीकोनातुन सदर प्रकल्पाची निकड लक्षात घेता कर्जपुरवठा लवकरात लवकर उपलब्ध करुन घेणे आवश्यक आहे.

Hudco मार्फत प्राप्त होणारे कर्ज हे सध्यस्थिती मधिल ११.५० टक्के या व्याज दराने (Floating Rate)महानगरपालिकेस Hudco या संस्थेच्या अटी व शर्तीनुसार प्राप्त करुन घेता येणार आहे या साठी Hudco या संस्थेस State Government Guarantee किंवा Equitable mortage of properties upto 125% of the loan amount देणे आवश्यक आहे तसेच प्राप्त होणा-या कर्जाचा कालावधी हा १५ वर्षासाठीचा राहणार आहे.

करीता Hudco या संस्थेकडे कर्ज प्रस्ताव सादर करणे,कर्ज मिळणे करीता State Government Guarantee शासनाकडुन प्राप्त करुन घेणे व यासाठी आवश्यक वेळोवेळी शासनाकडे करावी लागणारी कार्यवाही करणे साठी आयुक्त महानगरपालिका,औरंगाबाद यांना अधिकार प्रदान करणे बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

श्री.संजय केनेकर :५-१० वर्षात जे प्रोजेक्ट राबविले त्यांची संकल्पना काय होती खर्च कसा होतो लोकप्रतिनिधी म्हणून आम्हाला माहिती दयायला पाहिजे.यात नेमके मा.आयुक्तांना काय अधिकार प्रदान करतो आहोत याची माहिती व्हावी अधिकार प्रदान केल्यानंतर खालचे अधिकारी सभागृहाला सविस्तर माहिती वेळोवेळी देत नाही.

श्री.काशिनाथ कोकाटे :ही योजना कशी नियोजन कसे करणार आहे निधी कसा उभा करणार माहिती घ्यावी.

उपअभियंता(बीओटी) :नगरोत्थानचा मुळ प्रस्ताव यापुर्वीच २० फेब्रुवारी २०१० रोजी पारीत झाला आहे.अशी धारणा होती की गॅजेट प्रमाणे वित्तीय संस्था जी महाराष्ट्र अर्बन इन्फ्राट्रक्चर कंपनी जी होती त्यांचे कडून महापालिकेने नरोत्थानच्या जी आरच्या तरतुदी प्रमाणे कर्जाचा जो सहभाग ५० टक्के होता आता हा सहभाग ५० टक्के पेक्षा वर गेला आहे ३६७ कोटीचा प्रस्ताव शासनाकडे सादर केलेला आहे यात ५० टक्के शासनाचे अनुदान व ५० टक्के शासनाने नेमलेल्या एजन्सीकडून कर्ज स्वरूपात असणार आहे

श्री.काशिनाथ कोकाटे :प्रस्ताव चांगला आहे परंतु कर्जा पोटी जो हप्ता देणार तो किती व त्यानंतर विकास कामासाठी किती निधी शिल्लक असणार आहे. स्पील ओव्हरची कामे करणार की नाही.

श्री.रेणुकादास वैद्य :प्रदूषण नियंत्रण बोर्डाने मा. न्यायालयात रिट पिटीशन दाखल केले महापालिकेला नोटीस दिली होती मा.न्यायालयाचे म्हटले की शहरातील ड्रेनेज लाईनची दुरावस्था झाली ती व्यवस्थीत होणे गरजेचे परंतु मनपाची आर्थीक परीस्थिती बरोबर नसल्याने हा प्रोजेक्ट करू शकत नाही त्यामूळे मनपाने हा प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठूवन या प्रस्तावास मंजूरी घेवून व राज्य शासनाकडून ५० टक्के अनुदान घेवून ज्या ड्रेनेज लाईनचे चांगले काम करण्यासाठी राज्य शासनाकडून ५० टक्के अनुदान घेवून अशा प्रकारे हा प्रस्ताव मंजूर होण्याच्या दृष्टीने प्रयत्न करीत आहोत.शासनाची मंजूरी घेणेसाठी शासनाकडे प्रस्ताव पाठवित आहोत महापालिकेने हे काम करण्याची गरज आहे शासनाकडे मंजूरीसाठी प्रस्ताव पाठविण्या संदर्भात सभागृहाने विचार करावा.

श्री.काशिनाथ कोकाटे :विरोध नाही संपूर्ण चर्चा होवून निर्णय व्हावा.८० कोटी एजन्सीला देणार विकास कामासाठी रक्कम राहिल का माहिती दयावी.

श्री.गिरजाराम हळनोर :प्रस्तावानुसार शहरात काम करणे आवश्यक आहे नागरीकांचे आरोग्य धोक्यात येवू नये ५० टक्के शासन अनुदान देणार आहे शासनाकडे प्रशासनाने प्रस्ताव पाठवावा पारदर्शकता ठेवावी जो पत्रव्यवहार होईल कार्यवाही होईल त्याची माहिती वेळोवेळी देण्यात यावी.

डॉ. जफर खॉन :खर्चाचा विषय आहे मा.श्री. राजेंद्र दर्डा साहेब यांनी या बाबत मदत केली जनतेच्या हिताचा विषय आहे निर्णय घ्यावा.

मा.महापौर : विषय मंजुर करण्यात येतो. शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात यावा. राज्यशासन गॅरेंटी प्राप्त करुन घेण्यासाठी फक्त पत्रव्यवहार करण्याचे अधिकार आयुक्तांना देण्यात येते. त्याविषयीचा अहवाल प्रत्येक वेळेस सभागृहात देण्यात यावा.

**ठराव**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान शासन निर्णय क्रं.एसयुआर/२००८/प्र.क्रं/२०३/नवि ३३ दिनांक २० फेब्रुवारी २०१० नुसार शासनास सादर केलेल्या प्रस्तावांपैकी शहरातील मलनिःसारण व्यवस्था सुधारणे व शहरात मलप्रक्रिया केंद्र बांधणे बाबतच्या रक्कम रुपये ३६७.१६ कोटीच्या प्रकल्प प्रस्तावापैकी ५० टक्के म्हणजेच रुपये १८३.५८ कोटीचे कर्ज उभारणीसाठी Hudco या संस्थेकडे कर्ज प्रस्ताव सादर करणे,कर्ज मिळणे करीता State Government Guarantee शासनाकडुन प्राप्त करुन घेणे व यासाठी आवश्यक वेळोवेळी शासनाकडे करावी लागणारी कार्यवाही व पत्रव्यवहार करण्यास आयुक्त महानगरपालिका, औरंगाबाद यांना अधिकार प्रदान करणेस मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७८३:**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद शहरात दररोज ४५० ते ५०० मेट्रिक टन घनकचरा निर्माण होतो. यामध्ये जवळजवळ ३० ते ४० टक्के कचरा हा कोरडा म्हणजेच अविघटनशील असतो. ज्यामध्ये कागद, प्लास्टिककॅरीबॅग, थर्माकोल इत्यादिंचा समावेश असतो. हा कचरा अविघटनशील असल्याने त्याचा पर्यावरणावर व पर्यायाने सार्वजनिक आरोग्यावर विपरीत परिणाम होतो. हा कचरा मुख्यत: बाजारपेठा दुकानदार, कमर्शियल कॉम्पलेक्स यामधुन निघतो व तो शहरातील सार्वजनिक नाले, जमीन, रस्ते, पडीक जमीन, जलाशय, हॉटेल,

शॉपींग, व्यावसायीक आस्थापना, लोकांना दिसेल अशी जागा यामध्ये फेकला जातो हा 'अविघटनशील कचरा' फेकण्यास किंवा साठविण्यास प्रतिबंध करण्यासाठी कायदा करण्याची आवश्यकता निर्माण झाल्यामुळे महाराष्ट्र शासनातर्फे 'महाराष्ट्र अविघटनशील कचरा नियंत्रण अधिनियम २००६' अंमलात आणले असून सार्वजनिक नाले, मलनिस:रण मार्ग, नैसर्गिक किंवा मानव निर्मिती तलाव, खाडी, पांथळ जमिन, हॉटेल, शॉप, दुकाने, संस्थान, व्यावसायीक आस्थापना इत्यादी मध्ये 'अविघटनशील व विघटनशील कचरा' टाकण्यास उक्त अधिनियमाच्या कलमान्वये प्रतिबंध करण्यात आला आहे. त्यानुसार 'अविघटनशील व विघटनशील कचरा' ठेवण्यासाठी कचऱ्याचे जागीच ओला व सुका कचरा विलगीकरण करणे, संकलन करणे व शास्त्रशुध्द विल्हेवाट लावणे, कचरा विशिष्ट ठिकाणी ठेवण्याची तरतुद करणे व या संबंधी मालकांचे व भोगवटादारांचे कर्तव्ये, जबाबदारी या संबंधी तरतुद करणे व उपद्रव निर्माण होण्याची शक्यता असल्यास त्यासंबंधी स्थानिक प्राधिकरणाने नोटीस देऊन कार्यवाही करुन या बाबत उल्लंघन करणाऱ्या व्यक्तींवर, (दुकानदार, मालक, भोगवटादार इत्यादी) शास्ती लादणे हे अधिकार स्थानिक प्राधिकरण अथवा त्यांच्या तर्फे नियुक्त अधिकारी यांना सदरील अधिनियमान्वये प्रदान केलेले आहेत.

उक्त 'अविघटनशील व विघटनशील' कचऱ्याचे नियंत्रण करणे व त्याची विल्हेवाट करणे, आवश्यक असल्याने स्थानिक प्राधिकरण क्षेत्राच्या हद्दीमध्ये, महापालिका हद्दीमध्ये सदरील अधिनियमाच्या तरतूदीनुसार प्रभावी कार्यवाही करणे हे स्थानिक प्राधिकरणाचे/महानगरपालिकेचे कर्तव्य व जबाबदारी असल्याने सदरील अधिनियमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी व त्यामधील तरतूदींची अंमलबजावणी करण्यासाठी सदरील 'महाराष्ट्र अविघटनशील कचरा (नियंत्रण) अधिनियम २००६' व महाराष्ट्र (महानगरपालिका क्षेत्रातील 'अविघटनशील घन कचरा' योग्य व शास्त्रशुध्द पध्दतीने संसकलन करणे, विलगीकरण करणे व विल्हेवाट लावणे) नियम, २००६ मधील तरतूदी अन्वये कार्यवाही करण्याचे अधिकार आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद यांना प्रदान करण्यासाठी व त्यानुसार प्रशासकीय कार्यवाही करण्यासाठी प्रस्ताव महानगरपालिकेच्या मान्यतेस्तव सादर.

**संवाद**

श्री.संजय जोशी :या प्रोजेक्ट मध्ये काय करणार आहे. माहिती दयावी.

प्र.मा.आयुक्त :महाराष्ट्र अविघटनशील कचरा नियंत्रण अधिनियम २००६ हे पारीत होऊन ६ वर्ष झाले याची अमलबजावणी महापालिकेने करणे बंधनकारक आहे ही योजना नाही कायदयात ज्या बाबी आहे त्याची अमलबजावणी जे की कचरा टाकणेसाठी कचरा कुंड्या ठेवणे कुठेही कचरा टाकला जावू नये कायदयातील तरतुद नुसार कार्यवाही करण्यासाठी आयुक्तांना अधिकार प्रदान करायचे जर नोटीस दयायची नाल्यात टाकण्यात येत असलेला कचरा प्रतिबंधीत करायचा यात आहे मंजूरी दिल्यास कायदयाची अमलबजावणी होईल.

मा.महापौर :मंजूर

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहरातील 'अविघटनशील व विघटनशील' कचऱ्याचे नियंत्रण करणे व त्याची विल्हेवाट करणे, आवश्यक असल्याने स्थानिक प्राधिकरण क्षेत्राच्या हद्दीमध्ये, महापालिका हद्दीमध्ये सदरील अधिनियमाच्या तरतूदीनुसार प्रभावी कार्यवाही

करणे हे स्थानिक प्राधिकरणाचे/महानगरपालिकेचे कर्तव्य व जबाबदारी असल्याने सदरील अधिनियमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी व त्यामधील तरतूदींची अंमलबजावणी करण्यासाठी सदरील 'महाराष्ट्र अविघटनशील कचरा (नियंत्रण) अधिनियम २००६' व महाराष्ट्र (महानगरपालिका क्षेत्रातील 'अविघटनशील घन कचरा' योग्य व शास्त्रशुध्द पध्दतीने संसकलन करणे, विलगीकरण करणे व विल्हेवाट लावणे) नियम, २००६ मधील तरतूदी अन्वये कार्यवाही करण्याचे अधिकार आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद यांना प्रदान करण्यास मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७८४:**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद महानगरपालिकाची शहागंज भाजी मंडीत महावीर किराणा यांचे गोडाऊन भाडे तत्वावर मनपाने दिलेले आहे. तरी शहागंज येथील भाजी मंडी पुर्णपणे सपाट करण्यांत आलेली आहे तसेच महावीर किराणाची भाडे पावती रदद् करुन व गोडाऊनचा केलेला करार सुध्दा रदद् करण्यांत यावा व पुर्वी भाजी मंडीतील महावीर किराणाचा गोडाऊन भुईसपाट करण्यात यावा करिता प्रस्ताव सर्व साधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक :श्री.अब्दुल रऊफ खान महेमूद खान अनुमोदक :श्री.गाझी जुबेर अहमद

संवाद

श्री.रेणुकादास वैद्य : हा विषय सविस्तर माहितीसह प्रशासनाकडून यावा रद्य करावे.

मा.महापौर :प्रशासनाच्या मार्फत सविस्तरविषय यावा हा विषय रद्य करण्यात येतो.

**ठराव :-**

प्रस्तुत प्रस्ताव सविस्तर माहितीसह प्रशासनामार्फत सादर करण्यास मंजुरी देण्यात आली.

**विषय क्र. ७८५:**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र.७८ चिकलठाणा येथील मनपा शाळेचा दुसरा मजला बांधणे या कामाऐवजी मनपा शाळेचे कंपाऊंन्ड बांधणे व शाळेची संपूर्ण दुरुस्ती करणे कारण मनपा शाळेच्या भिंती अत्यंत खराब झालेल्या आहे. व काही भिंती पडलेल्या आहे त्यामुळे बाहेरील समाजकंटक त्या ठिकाणी रात्री पत्ते खेळत आहे.

करीता दुसरा मजला बांधणे ऐवजी संरक्षण भिंती व शाळेची दुरुस्ती करण्यात यावी.

| प्रस्तावीत काम २०११-१२ | सुधारीत काम |
|---|---|
| वार्ड क्रं ७८ चिकलठाणा मनपा शाळेचा दुसरा मजला बांधणे.<br>वार्ड ई-नवीन काम पान क्रं.४४ - ०५ लक्ष<br>वार्ड ई - नवीन काम पान क्रं. ४० - १० लक्ष | वार्ड क्रं.७८ चिकलठाणा मनपा शाळेचे संरक्षण भिंत व शाळेची दुरुस्ती करणे. १५ लक्ष |
| **एकुण १५ लक्ष** | **एकुण १५ लक्ष** |

सुचक :श्री.कावडे रवि साहेबराव,

अनुमोदक :श्री.राजगौरव हरिदास वानखेडे, श्री.अभिजीत भास्करराव देशमुख

**ठराव**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.७८ चिकलठाणा येथील मनपा शाळेचा दुसरा मजला बांधणे या कामाऐवजी मनपा शाळेचे कंपाऊंन्ड बांधणे व शाळेची संपूर्ण दुरुस्ती करण्यासाठी

प्रस्तावित कामासाठी केलेली तरतुद खालील प्रमाणे सुधारीत कामासाठी वळती करण्यास मंजुरी देण्यात येते.

| प्रस्तावीत काम २०११-१२ | सुधारीत काम |
|---|---|
| वार्ड क्रं ७८ चिकलठाणा मनपा शाळेचा दुसरा मजला बांधणे.<br>वार्ड ई-नवीन काम पान क्रं.४४ - ०५ लक्ष<br>वार्ड ई - नवीन काम पान क्रं. ४० - १० लक्ष | वार्ड क्रं.७८ चिकलठाणा मनपा शाळेचे संरक्षण भिंत व शाळेची दुरुस्ती करणे. १५ लक्ष |
| **एकुण १५ लक्ष** | **एकुण १५ लक्ष** |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७८६:**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, सद्यस्थितीत शहरातील वाढलेली रहदारी व गुन्हेगारी लक्षात घेता शहरात असलेल्या चौका-चौकात सीसीटीव्ही कॅमेरे असणे गरजेचे झालेले आहे. आंत्ताच दोन दिवसापुर्वी बाबा पेट्रोल पंप चौकामध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यांत आलेले आहे. या कार्यक्रमाच्या उद्‌घाटनप्रसंगी मा.पोलीस आयुक्त यांनी केलेल्या विनंतीनुसार चौका चौकात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी चौक दत्तक घेण्याचे आवाहन केलेले आहे. त्यानुसार मी एक चौक दत्तक घेत आहे. त्या मुख्य वर्दळीच्या चौकात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात यावे व त्यासाठी येणारा खर्च माझ्या स्वेच्छानिधीतून करण्यांत यावा. करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.बनकर कृष्णा सांडुजी अनुमोदक : श्री.चौधरी संजय सांडू

श्री.रेणुकादास वैद्य :उद्योजक एनजीओ यांना अशा प्रकारे संधी देण्यात यावी

मा.महापौर :मंजूर

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मा.पोलीस आयुक्त यांनी केलेल्या विनंतीनुसार चौका चौकात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी चौक दत्तक घेण्याचे आवाहन केल्यानुसार व प्रस्ताव सादर केलेले स.सदस्य एक चौक दत्तक घेत असुन मुख्य वर्दळीच्या चौकात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यास व त्यासाठी येणारा खर्च संबंधीत स.सदस्यांच्या स्वेच्छानिधीतून करण्यांस मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७८७:**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, माझ्या प्र.क्र.६१ समर्थनगर अंतर्गत विविध ठिकाणी पेव्हर ब्लॉक बसविणेच्या कामासाठी सन २०१२-२०१३ च्या अर्थसंकल्पात रक्कम रु. २०.०० लक्षाची तरतुद नवीन कॉंक्रीट रस्ते शहरी भाग या लेखाशिर्षा अंतर्गत ठेवण्यात आलेली आहे. सदर कामाची सद्य:स्थितीत आवश्यकता नसल्याने नमुद कामाची तरतुद या ऐवजी याच प्रभागातील उत्तर भागातील नाल्या लगत असलेल्या रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी रक्कम रु. २०.०० लक्षची रक्कम वळती करणेच्या प्रस्तावास आगामी सर्वसाधारण सभेत मान्यतादेवून सदरील काम तातडीने हाती घेणे बाबत संबंधीत विभागास आपल्या स्तरावर सुचीत करावे हि विनंती.

सुचक : श्री.समीर सुभाष राजुरकर

अनुमोदक : श्रीमती कविता संजय जाधव, श्रीमती रेणुका कृष्णा वाडेकर

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्र.क्र.६१ समर्थनगर अंतर्गत विविध ठिकाणी पेव्हर ब्लॉक बसविणेच्या कामासाठी सन २०१२-२०१३ च्या अर्थसंकल्पात रक्कम रु. २०.०० लक्षाची नवीन कॉक्रीट रस्ते शहरी भाग या लेखाशिर्षा अंतर्गत ठेवण्यात आलेली तरतुद याच प्रभागातील उत्तर भागातील नाल्या लगत असलेल्या रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या वळती करण्यास व काम तातडीने हाती घेण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७८८:**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, श्री.भिकन हरीभाऊ फुले मी लिपीक या पदावर बृहन्मुंबई महानगरपालिकेत जलकामे अ विभागात कार्यरत आहे. ते औरंगाबाद हर्सुल येथील रहिवासी आहे. आई-वडील वयोवृध्द असुन आईची प्रकृति नेहमीच खराब असते. नौकरीच्या ठिकाणाहुन त्यांच्या आजारावर उपचारार्थ व वेळो-वेळी लक्ष देणे शक्य होत नाही. तरी श्री.भिकन हरीभाऊ फुले यांनी औरंगाबाद महापालिकेत लिपीक या पदावर समावुन घेण्यासाठी विनंती अर्ज केला आहे.

करीता त्यांच्या विनंती अर्जावर सहानुभुतीपुर्वक विचार करुन त्यांना औरंगाबाद महानगरपालिकेत लिपीक पदावर समावुन घेण्याचा प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

सुचक :सौ.सावित्री हिरालाल वाणी अनुमोदक :सौ.सविता संतोष सुरे

श्री.रेणुकादास वैद्य :नियमाने कार्यवाही व्हावी

मा.महापौर :प्रशासनाने नियमानुसार कार्यवाही करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार श्री.भिकन हरीभाऊ फुले लिपीक या पदावर बृहन्मुंबई महानगरपालिकेत जलकामे अ विभागात कार्यरत आहे.त्यांनी केलेल्या विनंती अर्जानुसार त्यांना औरंगाबाद महापालिकेत लिपीक या पदावर समावुन घेण्यासाठी प्रशासनाने नियमानुसार कार्यवाही करण्यास मंजूरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७८९:**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, कटकटगेटच्या पुर्वेकडील पुलाची अवस्था अत्यंत वाईट झाली असुन या पावसाळयात सदरील पुल वाहुन जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच या नाल्याच्या पुलामुळे कटकट गेट या ऐतिहासिक वास्तुस धोका पोहचु शकतो. नागरिकांना होणारा पुराचा धोका आणि कटकटगेटची क्षती टाळण्यासाठी कटकटगेट च्या दोन्ही बाजुकडील जमीनीचे भु-संपादन करणे आवश्यक आहे. तसेच याठिकाणी नवीन पुल बांधणे देखील आवश्यक आहे.

करिता कटकट दरवाजाच्या दोन्ही बाजुची जागाचे भु-संपादनाची कार्यवाही आणि नवीन पुलाच्या बांधकामासाठी मंजुरी मिळण्याकरीता, तसेच या कामाकरिता आवश्यक आर्थिक तरतुद करण्यासाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेत सादर करण्यात येत आहे.

सुचक: श्री.खान जहांगीर अब्बास अनुमोदक :डॉ.खान जफर अहेमद

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, कटकटगेटच्या पुर्वेकडील पुलाची अवस्था अत्यंत वाईट झाली असुन कटकट दरवाजाच्या दोन्ही बाजुची जागाचे भु-संपादनाची कार्यवाही आणि नवीन

पुलाचे बांधकाम करण्यास व या कामाकरिता आवश्यक आर्थिक तरतुद करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७९०:**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, दिनांक ९.५.२०१२ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेतील विषय क्र.७४६ खालील कामा ऐवजी सुधारीत कामासाठी तरतुद ठेवुन काम हाती घेण्याचा प्रस्ताव पारीत करण्यात आला आहे. तथापी सुधारीत विकास कामातील शिर्षक वार्ड क्र.१४ रोजाबाग ईदगाह मैदानात हायमास्ट लाईट लावणे रक्कम रु. ०७ लक्ष ठेवण्यात आले होते या कामा ऐवजी वार्ड क्र.१४ रोजाबाग साहित्य सम्राट अण्णाभाऊ साठे चौक सिध्दार्थनगर येथे हायमास्ट लाईट लावण्यासाठी प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक: श्रीमती अहिरे संगिता राजु

अनुमोदक : श्री.शेख अब्दुल असद शेख अब्दुल रशीद, श्रीमती जरीना म.जावेद

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.१४ रोजाबाग ईदगाह मैदानात हायमास्ट लाईट लावणे रक्कम रु. ०७ लक्ष ठेवण्यात आलेली तरतुद या कामा ऐवजी वार्ड क्र.१४ रोजाबाग साहित्य सम्राट अण्णाभाऊ साठे चौक सिध्दार्थनगर येथे हायमास्ट लाईट लावण्याचे कामासाठी वळती करण्यास मंजूरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७९१:**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, श्री.समद उल्ला बेग P.No.१५,१६ व १७ रा. असिफ बाग यांना झाडे लावण्यासाठी मनपाने उदयान विभागाचे पत्र जा.क्र/मनपा/उदयान/ ५३०/९८ दिनांक ८/१०/९८ नुसार मनपाच्या खुल्या जागेत झाडे लावण्याची परवानगी दिलेली आहे.

परंतु श्री.बेग यांनी अनेक वेळा झाडे लावली ते झाडे जागा खुली असल्याने जनावरे झाडाची नासधुस करुन जातात यामुळे फक्त २५ ते ३० झाडेच मोठी झालेली आहे. करीता श्री.बेग यांनी सदर जागेवर त्यांच्या स्वत:च्या खर्चाने कंपाऊड बांधण्याची परवानगी दयावी जेणे करुन सदर जागेवर झाडे लावल्यावर त्यांची देखरेख करता येईल.

तरी ठराव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.बेहडे अशोक किसनराव अनुमोदक : श्रीमती वाघमारे ज्योती रुपचंद

श्री.रेणुकादास वैद्य :नियमाने कार्यवाही व्हावी.

मा.महापौर :नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्री.समद उल्ला बेग P.No.१५,१६ व १७ रा.असिफ बाग यांना झाडे लावण्यासाठी प्रस्तावात नमुद जागेवर त्यांच्या स्वत:च्या खर्चाने कंपाऊड बांधण्यासाठी नियमाप्रमाणे परवानगी देण्याबाबत वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७९२:**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र.४७ येथील विकास कामासाठी अर्थसंकल्पात तरतुद ठेवण्यात आलेली असुन खालील कामाऐवजी सुधारीत कामासाठी तरतुद ठेवण्यात येवुन कामा हाती घेण्याचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

| प्रस्तावित विकास काम | सुधारीत विकास काम |
|---|---|
| १. अर्थसंकल्प वार्ड ब नविन कामे पान क्र २१ | वार्ड क्र.४७ महाराष्ट्र पब्लीक शाळे पासुन |

| | |
|---|---|
| व्यापारी संकुले व इतर इमारती अ.क्र.५ वर वार्ड क्र.४७ येथील खुल्या जागेत व्यायाम शाळा बांधणे १३ लक्ष तरतुद ठेवण्यात आलेली आहे. | कुलस्वामीनी मंगल कार्यालय पर्यंत कॉंक्रेटींग करणे. ८.५० लक्ष तरतुद ठेवण्यात यावी. |

सुचक : श्री.चव्हाण हुशारसिंग मांगेराम, श्री.अनिल जुगललाल जैस्वाल
अनुमोदक : श्री.जायभाये सुर्यकांत सुभानराव

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.४७ येथील विकास कामासाठी अर्थसंकल्पात खालील प्रमाणे केलेली तरतुद सुधारीत विकास कामासाठी वळती करण्यास मंजुरी देण्यात येते.

| प्रस्तावित विकास काम | सुधारीत विकास काम |
|---|---|
| १. अर्थसंकल्प वार्ड ब नविन कामे पान क्र २१ व्यापारी संकुले व इतर इमारती अ.क्र.५ वर वार्ड क्र.४७ येथील खुल्या जागेत व्यायाम शाळा बांधणे १३ लक्ष तरतुद ठेवण्यात आलेली आहे. | वार्ड क्र.४७ महाराष्ट्र पब्लीक शाळे पासुन कुलस्वामीनी मंगल कार्यालय पर्यंत कॉंक्रेटींग करणे. ८.५० लक्ष तरतुद ठेवण्यात यावी. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.७९३:**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्रं.४५ रहेमानिया कॉलनी अंतर्गत यशोधरा कॉलनी महानगरपालिका शाळा आहे या शाळेत विद्यार्थी संखा ही १२५० आहे व वर्ग खोल्या फक्त १० आहे विद्यार्थी संख्या जास्त असल्याने बसण्यास जागा अपुरी पडत आहे. दोन-दोन तुकडया एकच वर्गात बसत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक प्रगतीवर परिणाम होत आहे. सदरील शाळा ही स्लम वसाहतीत आहे व शाळेत शिकणारी मुले हे गोर-गरीब रहिवासीयांची आहे. मागील सर्व साधारण सभेत किराडपुरा स्कुल नं.०२ ही शाळा यशोधरा कॉलनी मनपा शाळेत स्थलांतरीत करण्यांत आलेली आहे, ज्यामुळे सदरील शाळेत विद्यार्थ्याना बसण्यास जागा अपुरी पडत आहे.

सदरील शाळेच्या वरच्या मजल्याचे बांधकामासाठी अंदाजपत्रक मा.उप अभियंता (इमारती बांधकाम) यांनी सन २०११-२०१२ च्या दरसुची नुसार अंदाजपत्रक तयार केलेले आहे या कामासाठी रक्कम रुपये ६१.८६ लक्ष खर्च अपेक्षित आहे, सदरील खर्चास अर्थसंकल्पीय तरतुद करुन मंजुरी देण्यांत यावी. करिता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सविनय सादर.

सुचक: श्रीमती फिरदोस फातेमा खान, श्री.मीर हिदायत अली मीर बसालत अली,
श्री.खान जहांगीर अब्बास
अनुमोदक: डॉ.खान जफर अहेमद, श्री.शेख अब्दुल असद शेख अब्दुल रशीद

**संवाद :**

डॉ. जफर खान :मंजूर करावे सर्व शिक्षा अभियांन मधून रक्कम खर्च करता येईल
मा.महापौर :सर्वशिक्षा अभियान निधीतुन काम करण्यात यावे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार वार्ड क्रं.४५ रहेमानिया कॉलनी अंतर्गत यशोधरा कॉलनी महानगरपालिकेच्या शाळेच्या वरच्या मजल्याचे बांधकामासाठी रक्कम रुपये ६१.८६ लक्ष खर्चाच्या अंदाजपत्रकास व सदर काम सर्वशिक्षा अभियान या निधीतुन करण्यास मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**ऐनवेळचे विषय**

मा.महापौर :ऐनवेळचे विषय मंजूर

**विषय क्र. ७९४:-**

आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद हे प्रस्ताव सादर करीत आहे की, महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय मुंबई शासन निर्णय क्र मातंसं/प्रक्र २८/३९ दि ३ डिसेंबर, २००८ अन्वये महाराष्ट्र शासनाने राज्यातील सहा विभागीय क्षेत्रांत ई सेवा केंद्र स्थापित करण्यासाठी खाजगी संस्थाची नियुक्ती केली आहे औरंगाबाद विभागासाठी मे सिएमएस कॉम्प्युटर्स लि मुंबई यांची नियुक्ती करण्यात ओलेली आहेत. मा. सचिव, सा. प्र. माहिती तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई. यांनी दि ३०/५/२०१२ रोजी कळविल्या प्रमाणे महा-ऑन लाईन हि शासन पूरस्कृत संस्था आहे.

औरंगाबाद महानगरपालिकेच्या वार्ड कार्यालय अ ते फ मधून जन्म व मृत्यू प्रमाणपत्र, मालमत्ता कर व पाणीपट्टी बेबाकी प्रमाणपत्र व इतर विभागाकडून नागरिकांना वेगवेगळया सुविधा पुरविल्या जातात. या सुविधा उपलब्ध करून घेण्यासाठी नागरिकांना महानगरपालिकेच्या सहा वार्ड कार्यालय तसेच विविध विभाग आणि एक सुविधा केंद्र या ठिकाणी जावे लागते. या सुविधा महाराष्ट्र शासनाच्या शासन निर्णय क्रमांक मातस/२०१२/प्रक्र-१५२/३९, दिनांक २३ मे २०१२ नुसार महा-ई-सेवा केंद्रामार्फत या सुविधा नागरिकांना उपलब्ध करून देण्या बाबत विविध विभागांचे विभाग प्रमुख व सुविधा पुरविणाऱ्या कंपनीचे प्रतिनिधी यासह वेळोवेळी बैठका घेण्यात आलेल्या आहेत. सदर ठरावास दि.१५-६-२०१२ रोजी संपन्न झालेल्या मा.स्थायी समिती सभेने मंजुरी दिलेली आहे.

सी.एम.एस. कॅम्प्युटर्स लि. यांच्यातर्फे दि.१३ जुन २०१२ रोजी पत्र देवुन प्रत्येक सुविधा (Per Transaction) देण्यासाठी रू.२०/- अ सेवा कर असे दर कळविले आहे. त्याचप्रमाणे महा-ऑनलाईन लि., मुंबई यांनी दि.१३ जुन २०१२ रोजी सुविधासाठी आकारण्यात येणारे दर कळविले आहेत, ते खालील प्रमाणे आहेत.

०१. इंटरनेट द्वारे पेमेंट रू.५/- प्रत्येक रू.५००/- पेक्षा कमीच्या कामासाठी
०२. इंटरनेट द्वारे पेमेंट रू.१०/- प्रत्येक रू.५००/- किंवा त्यापेक्षा जास्तीच्या कामासाठी
०३. डेबीट-कार्ड द्वारे रू.१८/- प्रत्येक कामासाठी
०४. क्रेडीट कार्ड द्वारे रू.१/- टक्के शहरी देयकावर किंवा कमीत कमी रू.५/- प्रती कामासाठी

या सुविधा नागरिकांना त्यांच्या घरा जवळील महा-ई-सेवा केंद्रामार्फत सशुल्क सेवा उपलब्ध करून देण्यासाठी प्रस्ताव सादर करण्यात येत आहे. या प्रस्तावामध्ये औरंगाबाद महानगरपालिकेच्या क्षेत्रातील नागरिकांना महानगरपालिकेतर्फे पुरविल्या जाणाऱ्या विविध सेवा उपलब्ध होणार आहे.

तसेच गेटवे पेमेंटसाठी महा-ऑनलाईन, महा-ई-सेवा केंद्रासाठी सी.एम.एस. कंपनी, मायनेटसाठी-मे.ए.बी.एम. नॉलेजवेअर प्रा.लि. कंपनी, सेतु समिती इत्यादी सर्व संस्थाच्या समन्वयाने व आपआपसातील Integration द्वारे, महानगरपालिका सदर सुविधा नागरीकांपर्यंत पोहचविणार आहे.

वरील सेवा पुरविण्यासाठी महा-ई-सेवा केंद्र (सी.एम.एस.) औरंगाबाद महानगरपालिकेच्या संगणक प्रणालीशी संलग्न करून महा-ई-सेवा केंद्र यांचे मार्फत या सुविधांचा वापर करण्यास शासन निर्णया प्रमाणे सुविधा शुल्क आकारणी करून पुरविण्यात येणार आहेत. यामध्ये महानगरपालिकेला कोणत्याही प्रकारचा खर्च करावा लागणार नाही. उलटपक्षी जर अशी सुविधा केंद्रे महानगरपालिके तर्फे विविध भागांमधून सुरू करावयाचे झाल्यास प्रती केंद्रास अंदाजे रू.१,२५,०००/- एवढा खर्च अपेक्षित आहे. तो खर्च ही सुविधा उपलब्ध करून दिल्या नंतर वाचणार आहे.

या उपक्रमाव्दारे नागरिकांना चांगल्या प्रकारची आधुनिक पध्दतीचा वापर करून विविध सुविधासाठी करांचा भरणा करणे शक्य होणार आहे. या सुविधा मिळण्यासाठी सुविधेचा लाभ घेणाऱ्यास रू.२०/- अ सेवा कर आकारण्यात येणार आहे. याकरिता शहरात विविध ठिकाणी सुरु असलेल्या महा-ई-सेवा केंद्रामार्फत सुविधा उपलब्ध करून देणे तसेच वरील सर्व सेवा महानगरपालिकेच्या उपलब्ध असलेल्या संगणक प्रणालीचा वापर करून ऑन-लाईन पेमेंटसाठी उपरोक्त दरा प्रमाणे शासनाने निश्चित केलेल्या महा-ऑनलाईन या कंपनीकडून ई-पेमेंट गेटवे उपलब्ध करून घेऊन उपरोक्त दरा प्रमाण प्रस्ताव धोरणात्मक निर्णयास्तव व मान्यतेस्तव मा.सर्वसाधारण सभेपूढे सादर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेच्या विविध सेवा संगणक प्रणालीशी संलग्न करून नागरीकांना पुरविण्यात येणा-या महा-ई-सेवा केंद्रामार्फत उपलब्ध करून देणे तसेच महानगरपालिकेच्या सर्व सेवा उपलब्ध असलेल्या संगणक प्रणालीचा वापर करून ऑन-लाईन पेमेंटसाठी सी.एम.एस. कंपनी, मायनेटसाठी मे.ए.बी.एम.नॉलेजवेअर प्रा.लि. कंपनी, सेतु समिती इत्यादी सर्व संस्थाच्या समन्वयाने व आपआपसातील Intergration द्वारे प्रस्तावात दर्शविलेल्या दराप्रमाणे शासनाने निश्चित केलेल्या महा-ऑनलाईन या कंपनीकडून ई-पेमेंट गेटवे उपलब्ध करून घेणेस मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. :-७९५</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराष्ट्र शासन वित्त विभाग यांचे शासन आदेश क्र.संलेको-२०१२/प्र.क्र.१०५/२०१२/कोषा.प्रशा-२,मंत्रालय,मुंबई दि.१३जुन,२०१२ अन्वये श्री.अ.आ.थोरात, सहाय्यक संचालक स्थानिक निधी,लेखा,जालना यांची " मुख्य लेखाधिकारी" औरंगाबाद महानगरपालिका या पदावर बदलीने पदस्थापना करण्यात आली आहे.

सदर पदावर ते दि.१४/६/२०१२ रोजी मध्यान्हनंतर रुजु झाले आहे.रुजु झाल्याच्या तारखेपासुन एक वर्षाच्या कालावधीसाठी प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीनुसार प्रतिनियुक्तीस मान्यता देण्याबाबत प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महाराष्ट्र शासन वित्त विभाग यांचे शासन आदेश क्र.संलेको-२०१२/प्र.क्र.१०५/२०१२/कोषा.प्रशा-२,मंत्रालय,मुंबई दि.१३जुन,२०१२ अन्वये श्री.अ.आ.थोरात, सहाय्यक संचालक स्थानिक निधी,लेखा,जालना यांची " मुख्य लेखाधिकारी" औरंगाबाद

महानगरपालिका या पदावर बदलीने झालेली पदस्थापना व सदर पदावर त्यांना दि.१४/६/२०१२ रोजी मध्यान्हनंतर रुजु झाल्याच्या तारखेपासुन एक वर्षाच्या कालावधीसाठी महानगरपालिकेत अटी व शर्तीनुसार प्रतिनियुक्तीस मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.:- ७९६**

आयुक्त,महानगरपालिका,औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, प्रभाग क्र.७९ मुकुंदवाडी येथे खेळाच्या मैदानास संरक्षित भिंत बांधणे व पावसाचे पाणी वाहुन जाण्यासाठी गटार बांधणे या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन २०११-१२ च्या दरसुचीप्रमाणे तयार करण्यात आलेले असुन कामाचे अंदाजपत्रक रु.९५,८५,४४१/- चे आहे.

प्रस्तावित अंदाजपत्रकात मुकुंदवाडी येथे असलेल्या खेळाच्या मैदानास संरक्षित भिंत बांधणे व पुराचे पाणी वाहुन जाण्यासाठी गटार बांधणे या बाबींचा समावेश आहे. सदर खेळाच्या मैदानात सध्या पावसाचे पाणी साचते व त्यामुळे या भागातील रहिवांशाना उपद्रव होतो त्यामुळे खेळाच्या मैदानाचा विकास करणे आवश्यक आहे. प्रस्तावित कामाचा समावेश सन २०१२-१३ च्या अर्थसंकल्पात झाल्याबद्दल मा.महापौर यांनी दिनांक ९.५.२०१२ च्या पत्रान्वये लेखी कळविले आहे.

प्रस्तावित काम सुरु करण्यापुर्वी खेळाच्या मैदानाची जागा ही महानगरपालिका नांवाने अधिकार अभिलेखात करुन घेण्याची कारवाई करण्यात येईल व महानगरपालिकेच्या नावांवर जागा झाल्यानंतर बांधकाम सुरु करण्यात येईल. या अटीवर रु.९५,८५,४४१/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी मिळणेकरीता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.७९ मुकुंदवाडी येथे खेळाच्या मैदानास संरक्षित भिंत बांधणे व पावसाचे पाणी वाहुन जाण्यासाठी गटार बांधणेच्या कामासाठीचे रूपये ९५,८५,४४१/-चे अंदाजपत्रकास प्रस्तावित कामास प्रस्तावात नमुद केल्यानुसार मंजूरी देण्यात येते. नियमाप्रमाणे वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.:-७९७**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,औरंगाबाद शहरातील मुख्य रस्त्यांचे रुंदीकरण व मजबुतीकरण करणेचे काम प्रगतीपथावर असुन या रस्त्यांचे मजबुतीकरणा सह विविध भागातील रस्त्या मधिल वाहतुक बेटे तसेच दुभाजके विकसित तसेच सुशोभित होणे आवश्यक आहे.

शहरातील मुख्य रस्त्यांवरील दुभाजके व वाहतुक बेटे महानगरपालिके मार्फत विकसित करण्यात आलेली होती परंतु नियमित देखभाल दुरुस्ती अभावी सदर वाहतुक बेटांची तसेच दुभाजकांची निगा राखता आलेली नाही शहरातील मुख्य रस्त्यांवरील दुभाजके व वाहतुक बेटे नियमित देखभाल दुरुस्ती सह विकसित होणे आवश्यक असल्याने यासाठी शहरातील उद्योजक, बँकाचे प्रतिनिधी, बिल्डर्स असोसिएशन,संस्था यांची प्रायोजक म्हणुन नेमणुक होणे आवश्यक आहे यामुळे शहरातील मुख्य रस्त्यांवरील दुभाजके व वाहतुक बेटांची तसेच त्यामधिल विविध संकल्पनेवर आधारीत म्युरल्स, पुतळे यांची तसेच हिरवळींची नियमित देखभाल व संवर्धन करता येणार आहे.

मुख्य रस्त्यांवरील दुभाजके व वाहतुक बेटे विकसित करणे करीता प्रायोजकाची नेमणुक ही खालील अटी व शर्तीनुसार होणे आवश्यक आहे.

१. प्रायोजकास शहरातील अस्तित्वातील दुभाजकाची आवश्यक दुरुस्ती स्वखर्चाने करावी लागेल.

२. प्रायोजकास शहरातील अस्तित्वातील दुभाजकास वाहतुक शाखेने मंजुर केलेले काळा आणि पिवळा रंग लावणे बंधनकारक राहील हे रंग खालील मानकानुसार राहतील.

Provding and applying three coats of flat oil paint of approved colour and shade to internal/ external plastered surfaces including scaffolding if necessary, cleaning and preparing the surface (including primer coat) complete Spec.No. Bd.O 7 Pg.No. 408 I.No. 255 of PWD DSR 2011-12.

३. प्रायोजकास तयार कराव्या लागणा-या दुभाजकाची उंची डांबर रस्त्यापासून जास्तीत जास्त ७० सें.मी. वर ठेवावी लागेल.

४. विकसित करण्यात येणा-या दुभाजकामध्ये लावण्यात येणारी झाडे ही ६.०० मिटर अंतरावर लावावी लागतील झाडांच्या ग्रीलची उंची डांबर रस्त्यापासून १.१० मीटर पर्यंत ठेवावी लागेल.

५. प्रायोजकाने झाडांच्या संरक्षणासाठी वृक्षसंवर्धन नियमावली अंतर्गत असलेल्या नियमानुसार साहित्याचा वापर करुन कठडे उभारावी लागतील सदर काम करतांना वाहनचालकांना वाहन चालवितांना / पादचाऱ्यांना चालतांना अडथळा होणार नाही व त्याची रस्त्यापासून कमाल उंची १.१० मीटर असावी.

६. प्रायोजकास दुभाजकामधील ग्रिल (झाडांच्या संरक्षणासाठी पिंजरा) ही स्केअर पाईप / राऊंड पाईप / स्टेनलेस स्टील / चैनलिंक / cement ferrocrat मध्ये करावी लागतील.

७. दुभाजकातील ग्रिल (झाडांच्या संरक्षणासाठी पिंजरा) यास लावण्यात येणारा रंग हा हिरवा असावा तसेच तो आयएसआय .स्पेसिफिकेशन प्रमाणे व उत्तम दर्जाचा असावा रंगाचे स्पेसिफिकेशन खालील प्रमाणे आहे.
Provding and applying three coats lead/zinc base oil paint/bituminous paint of approved colour to new structural steel work and iron work including scaffolding if necessary, cleaning and preparing the surface (including primer coat) Spec.No. Bd.O 3 Pg.No. 404 I.No. 245 of PWD DSR 2011-12.

८ प्रायोजकास दुभाजकामध्ये असलेल्या विद्युत खांबाना महानगरपालिकेने ठरवून दिलेल्या स्पेसिफिकेशन प्रमाणे सिल्वर पेंट खांबाच्या पूर्ण उंची मध्ये खालील मानकानुसार लावावा लागेल.
Provding and applying three coats lead/zinc base oil paint/bituminous paint of approved colour to new structural steel work and iron work including scaffolding if necessary, cleaning and preparing the surface (including primer coat) Spec.No. Bd.O 3 Pg.No. 404 I.No. 245 of PWD DSR 2011-12.

९. दुभाजकातील अस्तित्वातील विद्युत खांबाची देखभाल दुरुस्ती महानगरपालिका करेल. मात्र दरवर्षी किमान एक वेळा त्याला वर नमुद केल्याप्रमाणे सिल्वर पेंट करण्याची जबाबदारी प्रायोजकाची असेल.

१०. दुभाजकात लावण्यात येणारी लॉन ही शक्यतो ऑस्ट्रेलियन या प्रकाराची असावी.

११. प्रायोजकास दुभाजकामध्ये खालील झाडे लावण्यास परवानगी आहे.

अ) बोगन वेल कमी उंचीची (minature) ब) फायकस बेंजामिना क) पांडा ड)

थिवेटीया इ) बिट्टी ई) कन्हेर (पांढरा, पिवळा व लाल यौपकी) फ) पेडी लेन्यस म) लँटेना त) उडेलीया व इतर कुठलेही समकक्ष झाडे.

१२. दुभाजकामध्ये असलेल्या विद्युत खांबावर जाहीरात लावण्यासाठी जो जाहीरात कर महानगरपालिकेच्या मा.सर्वसाधारण सभेने मान्य केलेला आहे त्या दराप्रमाणेच प्रायोजकास जाहीरात कर प्रतिवर्षी आगाऊ भरणा करावा लागेल. एकापेक्षा जास्त प्रायोजक दुभाजक सौदर्यीकरणासाठी इच्छुक असल्यास त्या सर्व प्रायोजकाकडुन लेखी स्वरुपात जाहीरात करा बाबत दरपत्रक मागवून जो प्रायोजक जास्तीचा दर देईल त्याच प्रायोजकास दुभाजकाचे प्रायोजकत्व देण्यात येईल.

१३. दुभाजका बरोबरच रस्त्याच्या दोन्ही बाजूने प्रायोजकास झाडे लावणे/ ग्रीन बेल्ट विकसीत करणे बंधनकारक राहील.

१४. दुभाजकामध्ये प्रत्येक ४० मीटर अंतरा नंतर म्हणजेच १.०० किलोमिटर मध्ये २५ ठिकाणी प्रायोजकास त्यांच्या संस्थेची जाहीरात लावण्याची परवानगी असेल या जाहीरात फलकावर दोन बाजूने प्रायोजकाची जाहीरात आणि दोन ठिकाणी महानगरपालिकेचा लोगो व स्लोगन राहील.

१५. वरील प्रमाणे दुभाजकाचे प्रायोजकत्व देण्याबाबत मान्यता झाल्यानंतर प्रायोजकास धोरणामध्ये नमुद करण्यात आलेली सर्व कामे ही अटी व शर्तीची पूर्तता करुन करावी लागेल. त्यानंतरच त्यांना त्यांची प्रायोजकत्वाची जाहीरात लावण्याची परवानगी देण्यात येईल. अटी व शर्तीत नमुद उक्त स्पेसिफिकेशन प्रमाणेच प्रायोजकास काम करावे लागेल.

१६. उपरोक्त नमुद स्पेसिफिकेशन प्रमाणे प्रायोजकत्व घेणाऱ्या संस्थेस कामाची संकल्पचित्रे महानगरपालिकेकडे दोन प्रतित सादर करावी लागेल.

**<u>प्रायोगिक तत्वावर वाहतुक बेटः प्रायोजकाकडुन अपेक्षित तांत्रिक अंमलबजावणी</u>**

१. प्रायोजकास वाहतुक बेटाच्या चार ही बाजूने संस्थेची जाहीरात लावण्यास परवानगी राहील. (जाहीरात फलकाची लांबी, रुंदी व उंची ही वाहतुकीस अडथळा होणार नाही अशा प्रकारे असावी. जाहीरात फलकाची लांबी,रुंदी व उंची यांचे आकारमान महानगरपालिका ठरवेल त्या प्रमाणे राहील.) तसेच प्रायोजकास वाहतुक बेटाचे ग्रिलवर फक्त जाहीरात फलक लावता येईल.

२. ऐतिहासीक संदर्भ असलेली संकल्पना वाहतुक बेटात असावी. वाहतुक बेटा मधिल अस्तित्वातील मुख्य पुतळा याला कुठल्याही प्रकारचे नुकसान होणार नाही याची दक्षता प्रायोजकास घेणे बंधनकारक राहील.

३. प्रायोजकास वाहतुक बेटाची कामे शहर अभियंता व उद्यान अधिक्षक यांचे मार्गदर्शनाखाली पूर्ण करावी लागेल.

४. वाहतुक बेटात लावण्यात येणारी लॉन ही शक्यतो ऑस्ट्रेलियन या प्रकाराची असावी.

५. वाहतुक बेटात खालील झाडे लावण्यास परवानगी आहे.

अ) बोगन वेल कमी उंचीची (minature) ब) फायकस बेंजामिना क) पांडा ड) थिवेटीया इ) बिट्टी ई) कन्हेर (पांढरा, पिवळा व लाल यौपकी) फ) पेडी लेन्यस म) लँटेना त) उडेलीया व इतर कुठलेही समकक्ष झाडे.

६. प्रायोजकास वाहतुक बेटाचे सौंदर्यीकरणा व्यतिरीक्त इतर कुठलाही वापर करता येणार नाही.

७. वाहतुक बेटामध्ये वाहतुकीस अडथळा ठरेल या पध्दतीची कुठलीही कृती प्रायोजकास करता येणार नाही.

८. वाहतुक बेटे ही महानगरपालिकेची मालमत्ता असुन निव्वळ देखभाल-दुरुस्ती व सौदर्यीकरण याच उद्देशाने ठराविक कालावधीसाठी वाहतुक बेटे प्रायोजकाच्या ताब्यात देण्यात येणार आहे.

९. प्रायोजकाने वाहतुक बेटामध्ये जास्तीत जास्त ऊर्जा बचतीचे दिवे लावण्यावर भर दयावा लागेल.

वरील नुसारच्या अटी व शर्तीसह प्रायोजकास ज्या त्या वाहतुक बेटे व रस्ते दुभाजकासाठी स्वतंत्र नोंदणीकृत करारनामा औरंगाबाद महानगरपालिकेस करुन दयावा लागेल यासाठीचा सर्व खर्च प्रायोजकास करावा लागेल.सदरील वाहतुक बेटे व दुभाजक हे प्रथम ७ वर्षा करीता देखभाल दुरुस्ती व संवर्धनासाठी देण्यात येणार असुन कामाची समाधानकारक प्रगती पाहुन पुढिल प्रत्येक ७ वर्षाचे नुतनीकरण करण्यात येईल यासाठीचा अधिकार महानगरपालिके कडे राहणार आहे

वाहतुक बेटे व दुभाजकाच्या उक्त अटी व शर्तीस मा.सर्वसाधारण सभेची मान्यता प्राप्त झाल्यानंतर प्रायोजकाचे संकल्पचित्रे मंजुर करणे,संबधिता सोबत करारनामा करणे इत्यादी बाबतचे अधिकार आयुक्त महानगरपालिका,औरंगाबाद यांना देणे बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहरातील मुख्य रस्त्यांवरील दुभाजके व वाहतुक बेटे नियमित देखभाल दुरूस्तीसह विकसित होणेसाठी शहरातील उद्योजक, बँकाचे प्रतिनिधी, बिल्डर्स असोसिएशन, संस्था यांची प्रायोजक म्हणून नेमणुक करणेस तसेच दुभाजके व वाहतुक बेटांची त्यामधील विविध संकल्पनेवर आधारीत म्युरल्स, पुतळे यांची तसेच हिरवळींची नियमित देखभाल व संवर्धन करणेस व सदरील कामाकरीता प्रायोजकाची नेमणुक ही प्रस्तावात दर्शविलेल्या अटी व शर्ती क्रमांक १ ते १६ तसेच प्रायोजकाकडुन अपेक्षित तांत्रिक अंमलबजावणी क्रमांक १ ते ९ च्या अटी व शर्तीस अधीन राहून ज्या त्या वाहतुक बेटे व रस्ते दुभाजकासाठी करारनामाचा सर्व खर्च प्रायोजकाने करून प्रथम ०५ वर्षाकरीता काम देण्यात येऊन व कामाची प्रगती पाहुन पुढील ५ वर्षाचे नुतीकरण करण्याच्या अधिकार मनपाकडे ठेवण्यास मंजूरी देण्यात येते. तसेच प्रायोजकाचे संकल्पचित्रे मंजुर करणे, संबधिता सोबत करारनामा करणे व उक्त अटी शर्तीमध्ये आवश्यक वाटतील असे बदल करणे इत्यादी बाबतचे अधिकार आयुक्त महानगरपालिका यांना देणेस मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. : ७९८** **(दिनांक ०९/०५/२०१२ च्या सर्वसाधारण सभेतील विषय-७४४)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्रीमती जोशी वर्षा वसंतराव, सहशिक्षिका प्राथमिक शाळा कोडेगांव केंद्र आरळ ता.वसमत जिल्हा हिंगोली येथे कार्यरत आहे. त्यांनी विनंती अर्ज सादर केला आहे. की, त्यांचे पती श्री.पराग नारायण कुंडळीकर हे भारतीय स्टेट बँक,शेंद्राबन शाखा मु.पो.कुंभेफळ ता.जि.औरंगाबाद येथे नौकरीवर आहेत. श्रीमती जोशी वर्षा वसंतराव यांना नौकरीच्या ठिकाणी जाण्या-येण्यासाठी लांब पडत असल्यामुळे त्यांनी औरंगाबाद महानगरपालिकेमध्ये पती-पत्नी एकत्रिकरण अंतर्गत बदली करण्यात यावी अशी विनंती केली आहे.

करिता प्रस्ताव विचारार्थ सादर.

श्री रेणुकादास वैद्य : मागील सभेतील विषय क्र.७४४ मंजुर केलेला नव्हता. त्यास मंजुरी देण्यात यावी.

मा.महापौर : मागील सभेतील विषय क्र.७४४ मंजुर.

**ठराव**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्रीमती जोशी वर्षा वसंतराव,सहशिक्षिका प्राथमिक शाळा कोडेगांव केंद्र आरळ ता.वसमत जिल्हा हिंगोली यांची औरंगाबाद महानगरपालिकेमध्ये पती-पत्नी एकत्रिकरण अंतर्गत नियमानुसार बदली करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबर राष्टगिताने सभा ंसंपल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**कार्यक्रम पत्रिका क्रमांक - (४४)**

**दिनांक २०.०६.२०१२ रोजी आयोजीत सर्वसाधारण सभेतील प्रश्नोत्तरे.**

**स.स. श्री.राजगौरव हरिदास वानखेडे::**

**प्रश्न क्र.१२१ ते १२५ :**

**उत्तर: (आस्थापना अधिकारी-१ )**

| प्रश्न | उत्तर |
|---|---|
| १२१. महानगरपालिका औरंगाबाद अस्थापनेवर सहाय्यक नगर रचनाकार या संवर्गातील एकुण मान्य पदाची माहिती देण्यात यावी.(किती पदे मंजुर आहेत?) | महानगरपालिकेच्या आस्थापनेवर कनिष्ठ अभियंता पदाची ७१ पदे मंजुर आहेत. सहाय्यक नगर रचनाकार हे पद महानगरपालिकेच्या सेवाभरती नियमात मंजूर आहे. सदर पद हे कनिष्ठ अभियंता या पदाच्या समकक्ष असून एकाच वेतनश्रेणीत आहे. सदर पदास स्वतंत्र मान्यता नाही. |
| १२२. सहाय्यक नगर रचनाकार या पदावर नेमणुक करण्यात आलेल्या अधिका-याची नियुक्ती रोष्टर प्रमाणे करण्यात आलेली आहे काय? | सदरील पद हे एकाकी पद असून सदरील पद भरतांना श्री.जयंत खरवडकर यांच्या शैक्षणिक अर्हतेनुसार त्यांना सदरील पदाचे पदनाम देण्यात आलेले आहे. |
| १२३. सध्या नियुक्त करण्यात आलेल्या अधिका-यांचे नियुक्तीचे वेळी कोणते निकष लावण्यात आले? व कोणत्या शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्यात आली? | आस्थापना समितीच्या अहवालाची छायांकित प्रत यासोबत जोडण्यात आलेली आहे. |
| १२४. सहाय्यक नगर रचनाकार या पदावर नेमणुक केलेल्या अधिका-याची नेमणुक कोणत्या पध्दतीने केली आहे? (जाहीरातीव्दारे /नामनिर्देशन/ पदोन्नती/पदनाम या पैकी) | श्री.जयंत खरवडकर यांना सहाय्यक नगर रचनाकार या पदाचे पदनाम देण्यात आलेले आहे. |
| १२५. सहाय्यक नगर रचनाकार या पदावर नेमणुक करण्यात आलेल्या अधिका-याने मेरी या संस्थेची व्यावसायीक परिक्षा उत्तीर्ण केली आहे का? केली नसल्यास केलेली कारवाई? | श्री.जयंत खरवडकर, सहाय्यक नगर रचनाकार तथा गुंठेवारी कक्ष प्रमुख यांनी मेरी तर्फे घेण्यात येणाऱ्या व्यावसायीक परिक्षा उत्तीर्ण केली नाही. तथापी महानगरपालिकेच्या सेवाभरती नियमानुसार वयाची ४५ वर्षे पुर्ण करणाऱ्यांना परिक्षा उत्तीर्ण होण्याची आवश्यकता नाही, अशी तरतुद आहे. सदर सेवाभरती नियमाची छायांकीत प्रत यासोबत जोडण्यांत आलेली आहे. |

**स.स. श्री.अब्दुल रऊफ खान महेमूद खान::**

**प्रश्न क्र.१२६ ते १३०** :

**उत्तर: (व्यवस्थापक जलतरण तलाव)**

| अ.क्र. | स.सदस्यांनी विचारलेले प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| ०१ | सिध्दार्थ जलतरण तलाव येथील व्यायाम शाळा बीओटी तत्वार दिलेली आहे का? | नाही |
| ०२ | सद्यस्थिती काय आहे? | व्यायामाचे साहित्य १० ते १५ वर्षापुर्वीचे असल्याचे बरेच साहित्य तुटलेले आहे. व काही साहित्य मोडकळीस आलेले आहे. म्हणुन सद्यास्थितीत व्यायामशाळा बंद आहे. |
| ०३ | कोणाच्या ताब्यात आहे? | महानगरपालिकेच्या ताब्यात आहे. |
| ०४ | लाईट बिल भरले का? किती भरले व कोणी | विद्युत विभागाशी संबंधित आहे. |

**उत्तर: (सहाय्यक संचालक नगर रचना)**

| प्रश्न | उत्तर |
|---|---|
| १२६. गरवारे स्टेडियम या क्रिडा संकुलात किती कर्मचारी कार्यरत आहे? त्याचा खर्च किती? व गरवारे स्टेडियमचे उत्पन्न किती? N-11 येथील व्यायाम शाळा (क्रिडा केंद्र) येथील कर्मचारी किती? त्यांच्यावरील खर्च किती? उत्पन्न किती? | या बाबतची माहिती क्रिडा विभागासंबंधित आहे. |
| १२७. N-2 बॅटमिटन हॉल कोणाच्या ताब्यात आहे? सध्या न्याय प्रविष्ट आहे का? सध्यास्थिती काय आहे? | सदर हॉल सध्या क्रिडा विभागाच्या ताब्यात आहे. औरंगाबाद जिल्हा पॉवर लिफ्टींग ॲण्ड वेट लिफ्टींग असोसिएशन यांना भाडे तत्वावर देणे बाबतचा ठराव क्र.७५६ अन्वये दि. ०९.०५.२०१२ च्या मा. सर्वसाधारण सभेत मंजूर झाला आहे त्याअनुषंगाने सध्या प्रकरण न्याय प्रविष्ठ आहे. |
| १२८. N-5 कम्युनिटी सेंटर बॅट मिंटन हॉल B.O.T वर दिलेले आहे का? लाईट बिल भरले का ? किती भरले? व कोणी? | सदर ठिकाणी बॅडमिंटन कोर्ट नाही. विद्युत बिलाचा भरणा विद्युत विभागासंबंधित आहे. |
| १२९. सिध्दार्थ जलतरण तलाव येथील व्यायाम शाळा, वेदांत नगर, जालान नगर, बंन्सीलाल नगर, ज्योती नगर, हे B.O.T. वर दिलेले आहे का? सदयास्थिती काय आहे? कोणाच्या ताब्यात आहे ? लाईट बिल भरले का? किती भरले ? व कोणी? | सिध्दार्थ उद्यान येथील जलतरण तलावाची व्यवस्थापन मा.अतिरिक्त शहर अभियंता या विभागासंबंधित आहे. वेदांतनगर, जालाननगर, बन्सीलालनगर, ज्योतीनगर येथील व्यायाम शाळा, हॉलचे व्यवस्थापन क्रिडा विभागामार्फत करण्यात येते. विद्युत बिलाचा भरणा विद्युत विभागामार्फत भरण्यात येते. |
| १३०. क्रिडा विभागात एकुण कर्मचारी किती? कोण कर्मचारी काय काम करतो ? क्रिडा विभागाला किती बजेट आहे.? | सदर माहिती क्रिडा विभागाशी संबंधित आहे. |

**उत्तर: (क्रिडा अधिकारी क्रिडा विभाग)**

| प्रश्न | उत्तर |
|---|---|
| १२६. गरवारे स्टेडियम या क्रिडा संकुलात किती कर्मचारी कार्यरत आहे? व गरवारे स्टेडियमचे उत्पन्न किती? | मनपा गरवारे क्रिडा संकूल येथे एकूण ०६ कर्मचारी आहे त्यापैकी ०१ कर्मचारी नागरी क्रिडा केंद्र क्र.६,एन-५ टाऊन सेंटर, सिडको येथे सुध्दा काम पाहतो. कर्मचारी यांचे पगार लेखा विभागामार्फत केले जाते ०१ एप्रिल २०१२ ते ३१ मे २०१२ पर्यंत एकूण उत्पन्न रु.५२,१९१.००/- लेखा विभागात जमा केले आहे. |
| N-11 येथील व्यायाम शाळा (क्रिडा केंद्र) येथील कर्मचारी किती? त्यांच्यावरील खर्च किती? उत्पन्न किती? | एन-११ येथील कै.प्रमोदजी महाजन क्रिडा संकूल येथे ०३ कर्मचारी काम पाहतात त्यापैकी ०१ कर्मचारी नागरी क्रिडा केंद्र क्र.२ येथील आहे, त्याचा पगार लेखा विभागामार्फत करण्यात येते.<br>एन-११ येथील उत्पन्न रु.२०,२६६.००/- ०१ एप्रिल २०१२ ते ३१ मे २०१२ पर्यत. |
| १२७. N-2 बॅटमिटन हॉल कोणाच्या ताब्यात आहे? सध्या न्याय प्रविष्ट आहे का? सध्यास्थिती काय आहे? | एन-२ कम्युनिटी सेंटर क्रिडा विभागाच्या ताब्यात आहे सध्या न्याय प्रविष्ठ आहे का? यांची कल्पना क्रिडा विभागाला माहिती नाही. सध्यास्थिती क्रिडा विभागामार्फत चालविले जाते. |
| १२८. N-5 कम्युनिटी सेंटर बॅट मिंटन हॉल B.O.T वर दिलेले आहे का? लाईट बिल भरले का ? किती भरले? व कोणी? | एन-५ कम्युनिटी सेंटर बॅडमिंटन हॉल B.O.T वर देण्याची प्रक्रिया B.O.T. विभागा कडून प्रस्तावित आहे. लाईट बील हे विद्युत विभागामार्फत भरले जाते. |
| १२९. सिध्दार्थ जलतरण तलाव येथील व्यायाम शाळा, वेदांत नगर, जालान नगर, बंन्सीलाल नगर, ज्योती नगर, हे B.O.T. वर दिलेले आहे का? सदयास्थिती काय आहे? कोणाच्या ताब्यात आहे ? लाईट बिल भरले का? किती भरले ? व कोणी? | सिध्दार्थ जलतरण तलाव येथील व्यायाम शाळा, वेदांतनगर, जालाननगर, बन्सीलालनगर ज्योती नगर हे B.O.T वर दिलेले आहे यांची कल्पना क्रिडा विभागाकडे नाही. सध्यास्थितीत क्रिडा विभागामार्फत चालविले जाते, लाईट बील विद्युत विभागमार्फत भरले जाते |
| १३०. क्रिडा विभागात एकुण कर्मचारी किती? कोण कर्मचारी काय काम करतो ? क्रिडा विभागाला किती बजेट आहे.? | क्रिडा विभागात एकूण ०४ कर्मचारी आहे.<br>क्रिडा स्पर्धा प्रमुख : नागरी क्रिडा कंद्र क्र.१ ते ६ केंद्र पाहतात व कै.प्रमोदजी महाजन क्रिडा संकूल व मनपा गरवारे क्रिडा संकूल हे संभाळतात.<br>क्रिडा विभागाचे एकूण बजेट रु. २७,१०,०००/- लक्ष आहे.<br>क्रिडा अधिकारी : क्रिडा विभागाचे काम पाहतात.<br>कनिष्ठ लिपीक : कनिष्ठ संवर्गातील कार्यालयीन कामे पाहतात.<br>शिपाई : वर्ग ४ चे सर्व कामे करतात. |

**उत्तर: (उप अभियंता, विद्युत-१ )**

| अ.क्र. | इमारतीचे नांव | माहेवारी विज देयक | भरणा केलेला आहे? |
|---|---|---|---|
| १ | एन-५ कम्युनिटी सेंटर (बॅट मिटन हॉल) | ६०००/- | आहे. |
| २ | ज्योती नगर (व्यायाम शाळा) वाचनालय | ८०००/- | आहे. |

**उत्तर: (उप अभियंता विद्युत -३ वॉर्ड अ /ड)**

| प्रश्न | उत्तर |
|---|---|
| सिध्दार्थ जलतरण तलाव येथील व्यायाम शाळास विद्युत पुरवठा बाबत लाईट बिल भरले का? किती भरले ? व कोणी ? | सिध्दार्थ जलतरण तलाव येथील व्यायाम शाळास विद्युत पुरवठा जलतरण तलावासाठी असलेल्या विद्युत पुरवठयातुन केला जातो जलतरण तलाव येथे एच.टी.विद्युत तलाव, सिध्दार्थ उद्यान, प्राणी संग्रहालय, निवसताने यांना विद्युत पुरवठा केला जातो विद्युत देयक प्रत्येक महिन्यालाभरले जाते माहे मे महिन्यात १०७००० भरले माहे जुन महिन्यात २,८४,१४२ देयक प्राप्त झाले आहे. |

**(प्रश्न क्रमांक १२१ ते १२५ च्या संबंधाने )**

**श्री.जयंत खरवडकर,शाखा अभियंता यांना सहाय्यक नगर रचनाकार या पदी पदस्थापना देणेबाबत.**

औरंगाबाद महानगरपालिकेच्या आस्थापनेवर कार्यरत श्री.जयंत खरवडकर,शाखा अभियंता यांनी वेळोवेळी अर्ज देवून मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार नगर रचना विभागात सहाय्यक नगर रचनाकार या पदावर पदस्थापना देण्याबाबत विनंती केलेली आहे.

त्यानुषंगाने मा.उच्च न्यायालयात दाखल केलेल्या रिट याचिका क्र.२५९४/९५ दि.४/६/२००३ अन्वये श्री.जयंत खरवडकर,यांना सहाय्यक नगर रचनाकार हे पद रिक्त असल्यास त्या पदावर पदस्थापना देण्याबाबतचे स्वतंत्र महापालिकेस देण्यात आलेले आहे,विधी सल्लागार यांनी नगर रचना विभागात सहाय्यक नगर रचनाकार हे पद रिक्त असल्यास संबंधित कर्मचाऱ्याच्या योग्यतेबाबत सहाय्यक संचालक नगररचना यांचा अभिप्राय घेवून,सहाय्यक नगर रचनाकार या पदावर पदस्थापना देता येईल म्हणून अभिप्राय दिला आहे.

त्यानुसार श्री.जयंत खरवडकर,यांनी यापूर्वी नगर रचना विभागात रचना सहाय्यक,सहाय्यक नगर रचनाकार व नगर रचनाकार या पदावर काम केलेले असल्याने तसेच त्यांना नगर रचनाचा अनुभव व नगर रचना विषयाबाबत चांगले ज्ञान असल्याने सहाय्यक संचालक नगररचना यांनी त्यांना सहाय्यक नगर रचनाकार या पदावर पदस्थापना दिल्यास,नगर रचना विभागास त्याचा चांगला उपयोग होईल,अशी शिफारस केलेली आहे.

श्री.जयंत खरवडकर हे सध्या महानगरपालिका आस्थापनेवर शाखा अभियंता या पदावर रु.९३००-३४८०० ग्रेड पे-४४०० या वेतनश्रेणीत कार्यरत आहेत. महापालिका सेवाभरती नियमात सहाय्यक नगर रचनाकार हे पद मंजूर आहे. तसेच संबंधितांनी यापूर्वी या पदावर काम केलेले आहे. तसेच सहाय्यक नगर रचनाकार व शाखा अभियंता हे पद समकक्ष व एकाच वेतनश्रेणीत असल्याने मा.उच्च न्यायालयाने दिलेले दि.४/६/२००३ चे निर्देश व तसेच श्री.जयंत खरवडकर,यांना सहाय्यक नगर रचनाकार या पदावर पदस्थापना देण्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल पाठविण्याबाबत नगर विकास विभागाचे उपसचिव, यांचे पत्र क्र.एमयुसी/१००४/९०५/प्र.क्र.१९६/नवि-२४. दि.११/४/२००७ अन्वये कळविले आहे.

त्यानुसार श्री.जयंत सर्वोत्तमराव खरवडकर,शाखा अभियंता यांनी यापूर्वी नगर रचना विभागात रचना सहाय्यक, सहाय्यक नगर रचनाकार व नगर रचनाकार या पदावर काम केलेले असल्याने तसेच त्यांना नगर रचनाचा अनुभव व नगर रचना विषयाबाबत चांगले ज्ञान असल्याने सहाय्यक संचालक नगररचना यांनी त्यांना सहाय्यक नगर रचनाकार या पदावर पदस्थापना दिल्यास,नगर रचना विभागास त्याचा चांगला उपयोग होईल,अशी शिफारस केलेली आहे.

तथापी मा.उप सचिव,महाराष्ट्र शासन यांचे परिपत्रक क्र.टीपीव्ही २४/१०/१५८/प्र.क्र.५१/१०/ नवि-२७. दि.५/४/२०१० अन्वये महानगरपालिकेतील उपसंचालक,नगर रचना,सहाय्यक संचालक नगररचना,नगर रचनाकार व सहाय्यक नगर रचनाकार पदावर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील अधिकाऱ्यांची नियुक्ती न करण्याबाबत कळविले आहे.

करिता प्रकरण निवड समितीच्या विचारार्थ सादर.

स्वाक्षरीत/-
आस्थापना अधिकारी-१,
महानगरपालिका औरंगाबाद

**(प्रश्न क्रमांक १२१ ते १२५ च्या संबंधाने )**

**श्री.जयंत खरवडकर, शाखा अभियंता यांना सहाय्यक नगर रचनाकार**

**या पदी पदस्थापना देणेबाबत संपन्न झालेल्या निवड समितीचा अहवाल.**

**श्री.जयंत खरवडकर,शाखा अभियंता यांना सहाय्यक नगर रचनाकार या पदी पदस्थापना देणेबाबत मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५४ (१) अन्वये गठीत केलेल्या निवड समितीची बैठक दि.१७/०८/२०१० रोजी मौलाना अबुल कलाम आझाद संशोधन केंद्र येथे घेण्यात आली. बैठकीस खालीलप्रमाणे समिती सदस्य हजर होते.**

| | | |
|---|---|---|
| **१) उपआयुक्त (म)** | **-** | **अध्यक्ष** |
| **२) मुख्य लेखा परिक्षक** | **-** | **सदस्य** |
| **३) शहर अभियंता** | **-** | **सदस्य** |
| **४) आस्थापना अधिकारी** | **-** | **सदस्य सचिव** |

**सर्व प्रथम आस्थापना अधिकारी-१ यांनी श्री.जयंत खरवडकर,शाखा अभियंता यांना सहाय्यक नगर रचनाकार या पदी पदस्थापना देणेबाबत सविस्तर अहवाल सादर केला.**

**औरंगाबाद महानगरपालिकेच्या आस्थापनेवर कार्यरत श्री.जयंत खरवडकर,शाखा अभियंता यांनी वेळोवेळी अर्ज देवून मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार नगर रचना विभागात सहाय्यक नगर रचनाकार या पदावर पदस्थापना देण्याबाबत विनंती केलेली आहे.**

**त्यानुषंगाने मा.उच्च न्यायालयात दाखल केलेल्या रिट याचिका क्र.२५९४/९५ दि.४/६/२००३ अन्वये श्री.जयंत खरवडकर,यांना सहाय्यक नगर रचनाकार हे पद रिक्त असल्यास त्या पदावर पदस्थापना देण्याबाबतचे स्वतंत्र महापालिकेस देण्यात आलेले आहे,विधी सल्लागार यांनी नगर रचना विभागात सहाय्यक नगर रचनाकार हे पद रिक्त असल्यास संबंधित कर्मचाऱ्याच्या योग्यतेबाबत सहाय्यक संचालक नगररचना यांचा अभिप्राय घेवून,सहाय्यक नगर रचनाकार या पदावर पदस्थापना देता येईल म्हणून अभिप्राय दिला आहे.**

**त्यानुसार श्री.जयंत खरवडकर,यांनी यापूर्वी नगर रचना विभागात रचना सहाय्यक,सहाय्यक नगर रचनाकार व नगर रचनाकार या पदावर काम केलेले असल्याने तसेच त्यांना नगर रचनाचा अनुभव व नगर रचना विषयाबाबत चांगले ज्ञान असल्याने सहाय्यक संचालक नगररचना यांनी त्यांना सहाय्यक नगर रचनाकार या पदावर पदस्थापना दिल्यास,नगर रचना विभागास त्याचा चांगला उपयोग होईल,अशी शिफारस केलेली आहे.**

**श्री.जयंत खरवडकर हे सध्या महानगरपालिका आस्थापनेवर शाखा अभियंता या पदावर रु.९३००-३४८०० ग्रेड पे-४४०० या वेतनश्रेणीत कार्यरत आहेत. महापालिका सेवाभरती नियमात सहाय्यक नगर रचनाकार हे पद मंजूर आहे. तसेच संबंधितांनी यापूर्वी या पदावर काम केलेले आहे. तसेच सहाय्यक नगर रचनाकार व शाखा अभियंता हे पद समकक्ष व एकाच वेतनश्रेणीत असल्याने मा.उच्च न्यायालयाने दिलेले दि.४/६/२००३ चे निर्देश व तसेच श्री.जयंत खरवडकर,यांना सहाय्यक नगर रचनाकार या पदावर पदस्थापना देण्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल पाठविण्याबाबत नगर विकास विभागाचे उपसचिव, यांचे पत्र क्र.एमयुसी/१००४/९०५/प्र.क्र.१९६/नवि-२४. दि.११/४/२००७ अन्वये कळविले आहे.**

**त्यानुसार मा.उच्च न्यायालयाचा निर्देश व शासनाने या संदर्भात वेळोवेळी केलेला पत्रव्यवहार विचारात घेता,श्री.जयंत सर्वोत्तमराव खरवडकर,शाखा अभियंता यांना नगर रचना विभागात सहाय्यक नगर रचनाकार या पदावर पदस्थापना दिल्यास त्यांच्या ज्ञानाचा व अनुभवाचा नगर रचना विभागास फायदाच होईल. त्यांना नगर रचना विभागात सहाय्यक नगर रचनाकार या पदावर पदस्थापना दिल्यास त्याचा मनपाच्या आस्थापना खर्चावर कोणताही अधिक भार पडणार नाही.**

**करिता वरील सर्व बाबींचा साकल्याने विचार करुन श्री.जयंत सर्वोत्तमराव खरवडकर,शाखा अभियंता यांना सहाय्यक नगर रचनाकार या पदावर कायमस्वरुपी पदस्थापना नगर रचना विभागात त्यांना सध्या दिलेल्या वेतनश्रेणी रु.९३००-३४८०० ग्रेड पे-४४०० मध्येच करणेबाबत सर्वानुमते शिफारस करण्यांत येते. तसेच आदेश निर्गमनानंतर त्यांचे नांव कनिष्ठ अभियंता संवर्गातून कमी करुन सहाय्यक नगर रचनाकार या पदाची स्वतंत्र ज्येष्ठता यादी तयार करण्याचीही समिती शिफारस करते.**

| | | |
|---|---|---|
| **स्वाक्षरीत/-** | **स्वाक्षरीत/-** | **स्वाक्षरीत/-** |
| **सदस्य सचिव तथा** | **सदस्य तथा** | **सदस्य तथा** |
| **आस्थापना अधिकारी-१,** | **शहर अभियंता,** | **मुख्य लेखा परिक्षक,** |
| **महानगरपालिका औरंगाबाद** | **महानगरपालिका औरंगाबाद** | **महानगरपालिका औरंगाबाद** |

**स्वाक्षरीत/-**

**अध्यक्ष तथा**

**उपआयुक्त (महसूल),**

**महानगरपालिका औरंगाबाद**

**(प्रश्न क्रमांक १२१ ते १२५ च्या संबंधाने )**

वाचा :- मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५४(१) अन्वये गठीत केलेल्या कर्मचारी निवड समितीचा दि.१७/८/२०१० रोजीच्या बैठकीचा अहवाल.

जा.क्र./मनपा/आस्था-१/२०१०/

कार्यालय महानगरपालिका औरंगाबाद

दिनांक :- / /२०१०.

**कार्यालयीन आदेश :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५४ (१) अन्वये गठीत केलेल्या कर्मचारी निवड समितीने शिफारस केल्यानुसार **श्री.जयंत सर्वोत्तमराव खरवडकर,शाखा अभियंता** यांचा संवर्ग बदलून त्यांना **'सहाय्यक नगर रचनाकार'** हे पदनाम देवून त्यांची कायमस्वरुपी पदस्थापना नगर रचना विभागात त्यांना कार्यरत वेतनश्रेणी **रु.९३००-३४८०० ग्रेड पे-४४००** मध्ये करण्यांत येते. त्यांनी पदस्थापनेच्या पदावर रुजू होवून अनुपालन अहवाल सादर करावा.

स्वाक्षरीत/-

**आयुक्त,**

महानगरपालिका,औरंगाबाद

प्रत :-

१) लेखा परिक्षण विभाग
२) लेखा विभाग
३) नगर रचना विभाग
४) संबंधितास
५) आदेश संचिका

:

**(प्रश्न क्रमांक १२१ ते १२५ च्या संबंधाने )**

**समयश्रेणी :**

(अ) महानगरपालिकेतील एखादा कर्मचारी ज्या पदावर / संवर्गात सतत १५ वर्षापासून काम करत असेल अशा कर्मचाऱ्यास तो ज्या पदावर नियुक्त झाला व सतत १५ वर्षे त्याच पदावर किंवा संवग्रात तो काम करत असेल व त्यांचे काम समाधानकारक असेल अशा कर्मचाऱ्यास तो सध्या ज्या वेतनश्रेणीत/ निवड श्रेणीत काम करत असेल त्याला त्या नंतरची जी काही शासकीय संवर्गामध्ये वेतनश्रेणी असेल त्या वेतनश्रेणीस तो १५ वर्षानंतर पात्र राहील.

(६) खातेनिहाय परिक्षा / प्रशिक्षण :

ज्या कर्मचाऱ्यांची नियुक्ती पदोन्नतीने /नामनिर्देशनाने होईल अशा कर्मचाऱ्यांना त्याचे नियुक्तीचे तारखेपासुन तीन वर्षाचे आत त्या पदासाठी विहित करण्यात आलेली परिक्षा / प्रशिक्षण उत्तीर्ण करणे आवश्यक राहील. जे उमेदवार विहित परिक्षा विहित कालावधीत उत्तीर्ण करणार नाहीत त्या उमेदवारांच्या बाबतीत सक्षम अधिकाऱ्याने परिक्षा उत्तीर्ण व्हावयाचा कालावधी आणखी वाढवून न दिल्यास अशा कर्मचाऱ्यास नोकरीतून बडतर्फ किंवा पदावनत करण्यात येईल. परंतु अशा ज्या कर्मचाऱ्यांनी वयाची ४५ वर्षे पूर्ण केली असतील त्यांना ही परिक्षा पास होण्याचे बंधन राहणार नाही.

(७)

कोणताही कर्मचारी / अधिकारी महानगरपालिकेच्या अस्थापनेवर नियुक्त झाल्यास नियुक्तीचे तारखेपासुन सहा महिन्याचे आंत त्या अधिकाऱ्याने / कर्मचाऱ्याने औरंगाबाद महानगरपालिकेच्या वैद्यकीय अधिकाऱ्याने विहित केलेल्या नमुन्यात वैद्यकीयदृष्टया सक्षम असल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहिल, तसेच चारित्र्याचे प्रमाणपत्र आयुक्त ठरवतील त्या नमुन्यात सक्षम व्यक्तीकडून न सादर करणे आवश्यक राहील.

(८) **उमेदवाराची अपात्रता:**

जे उमेदवार स्वतःत्याचे नातेवाईकाकडून न अथवा मित्राकडून न अगर इतर कोणत्याही मार्गाने स्वतःच्या नियुक्तीबाबत किंवा अप्रत्यक्षरित्या दबाव आणण्याचा प्रयत्न करीत असा उमेदवार किंवा उच्च पदावर पदोन्नतीसाठी प्रयत्न करणारा कर्मचारी नियुक्तीसाठी किंवा पदोन्नतीसाठी अपात्र ठरविण्यांत येईल.

(९) **रद्दबादल:**

या नियमाच्या अंमलबजावणीच्या तारखेपुर्वी अंमलात असलेले कोणतेही नियम किंवा उपविधी रद्दबादल

नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद